**राज्यस्तरीय तालीका तयार करण्याचे वेळापत्रक (कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)**

| दिनांक | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|
| 19.4.2023 | अधिकृत संस्थांकडून अर्ज मागविण्याची सुचना दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणे. |
| | राज्यस्तरीय तालीका तयार करण्यासाठीचे वेळापत्रक, अर्जाचा नमुना, अटी-शर्ती व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे तसेच संकीर्ण सुचना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. |
| 19.4.2023 ते 02.05.2023 (सकाळी 11.00 ते सायं. 5.00 वा.) | अधिकृत संस्थांकडून अर्ज/पुरक कागदपत्रे सिलबंद लिफाफ्यामध्ये स्विकृत करणे. |
| 03.05.2023 | संस्थांचे सिलबंद लिफाफे उघडणे व अर्ज/कागदपत्रांची छाननी करणे. |
| 04.05.2023 | आवश्यकतेनुसार अर्ज/कागदपत्रे पुर्ततेसाठी संस्था प्रतिनिधी समवेत चर्चा करणे. |
| 04.05.2023 | राज्यस्तरीय समिती सभेचे आयोजन करणे. |
| 08.05.2023 | राज्यस्तरीय तालीकेचे प्रसिध्दीकरण (कार्यालयाचे संकेतस्थळ व सुचना फलक) |

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील ऑनलाईन सरळसेवा नोकरभरतीसाठी अधिकृत संस्थांमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना (सिलबंद लिफाफ्याद्वारे)**

(संस्थेच्या लेटरहेडवर)

प्रति,
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, म.रा., पुणे

विषय :- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील ऑनलाईन सरळसेवा नोकरभरतीसाठी अधिकृत संस्थांच्या राज्यस्तरीय तालीकेमध्ये नाव समाविष्ट करणेसाठीचा अर्ज.

संदर्भ :- सहकार आयुक्तालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली दिनांक 19.4.2023 रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रामधील जाहीरात व कार्यालयाच्या संकेतस्थळावरील जाहीरात.

महोदय,

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये सरळसेवा ऑनलाईन नोकरभरती प्रक्रियेसाठी शासन आदेश दिनांक 15 जून 2018 व दिनांक 23 जून 2022 मधील तरतुदीनुसार सहकार आयुक्तालयाच्या स्तरावर राज्यस्तरीय तालीका तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाहीसाठी इच्छुक/पात्र अधिकृत संस्थांकडून संदर्भाद्वारे अर्ज मागविण्यात आले आहेत. शासन आदेश क्रमांक जिमस 0418/694/प्र.क्र. 59/2-स, दिनांक 15 जून 2018 व सम क्रमांक दिनांक 23 जून 2022 मधील तरतुदीनुसार ऑनलाईन सरळसेवा भरतीचे कामकाज करण्यास संस्था तयार आहे. त्यानुसार आमच्या संस्थेमार्फत अर्ज सादर करण्यात येत आहे. सदर अर्जासोबत संदर्भामध्ये नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रे जोडण्यात आली आहेत. संस्थेचा GSTIN क्रमांक ----------------- आहे.

याबाबत या संस्थेचे प्रतिनिधी श्री. ---------------------------------------, भ्रमणध्वनी क्रमांक ------

------ व ई-मेल -------------------------- यांना संपर्कासाठी संस्थेमार्फत प्राधिकृत करण्यात येत आहे.

सोबत :- 1) संस्था संचालक मंडळ ठरावाची प्रत
2) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
3) संस्थेकडील अनुभव प्रमाणपत्रे/पत्रांच्या प्रती
4) ऑनलाईन परिक्षा प्रक्रिया क्षमतेचा तपशिल
5) स्वयं प्रतिज्ञापत्र
6) सन 2021-22 आयकर विवरणपत्र प्रत
7) संचालकांची नावे व पत्ते

सही/-
अधिकृत व्यक्ती नाव/पदनाम
संस्थेचे नाव

## राज्यस्तरीय तालीकेमध्ये नाव समाविष्ट करावयाच्या अटी-शर्ती व अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल

सदर राज्यस्तरीय तालीकेमध्ये IBPS, TCS, ITI, BECIL व VAMNICOM या संस्थांचा समावेश राहील. या संस्थांव्यतिरिक्त अन्य इच्छूक संस्थांसाठी राज्यस्तरीय तालीकेमध्ये नाव समाविष्ट करावयाच्या अटी-शर्ती व अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्हता/निकष | पूरक कागदपत्रे |
|---|---|---|
| 1 | राज्यस्तरीय तालीकेवर नियुक्त करण्यात येणारी संस्था नोंदणीकृत होऊन 10 वर्षे झालेली असावीत. त्याचप्रमाणे मुख्यालय महाराष्ट्र राज्यातील असावे. | संस्था नोंदणीचे स्वयं स्वाक्षांकीत प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर करावी. |
| 2 | सदर संस्थेने या अगोदर व्यापारी बँका (राष्ट्रीयकृत बँका/खाजगी बँका/प्रादेशिक ग्रामीण बँका), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका तसेच शासनातील विविध विभागांसाठी किमान 3 वेळा ऑनलाईन नोकरभरतीची प्रक्रिया राबविलेली असावी. | या अनुषंगाने संबंधीत बँक अथवा शासकीय विभागाचे सरळसेवा ऑनलाईन परिक्षा प्रक्रियेचे कामकाज केले असल्याबाबतचे पत्र/ प्रमाणपत्राची स्वयं स्वाक्षांकीत प्रत (Self-attested/Certified) |
| 3 | संबंधीत संस्थेविरुध्द यापुर्वी कोणत्याही नोकरभरतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींच्या चौकशीमध्ये संबंधीत संस्था परिक्षेसंबंधी गलथान व्यवस्थापन, भ्रष्टाचार, गुन्हेगारी पध्दतीचा हस्तक्षेप, इ. बाबतीत दोषी असल्याचे सिध्द झालेले नसावे किंवा सदर संस्थेला नोकरभरतीच्या अनुषंगाने काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नसावे. | याबाबतचा तपशिल देण्यात यावा. तसेच विहीत केलेल्या बाबतीत दोषी नसल्याबाबतचे अथवा काळ्या यादीमध्ये समाविष्ट केले नसल्याबाबतचे स्वयं प्रतिज्ञापत्र सादर करावे. |
| 4 | संबंधीत संस्थेकडे नोकरभरती प्रक्रिया सक्षमपणे व कार्यक्षमपणे ऑनलाईन | याबाबतची कागदपत्रे सादर करावीत. यामध्ये संस्थेकडील तांत्रीक तसेच व्यवस्थापकीय सेवकांचा |

| | | |
|---|---|---|
| | पध्दतीने राबविण्याची सुविधा, आवश्यक मनुष्यबळ, परिक्षा कक्ष, संगणक यंत्रणा, इ. बाबींची उपलब्धता असावी अथवा आऊटसोर्सीग पध्दतीने करण्याची क्षमता असावी. | तपशिल द्यावा. तसेच संस्थेने विविध जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन नोकरभरती प्रक्रिया एका/ अनेक सत्रामध्ये घेतली असल्यास त्याबाबतचा तपशिल द्यावा.<br>त्याचप्रमाणे संस्थेकडे संकेतस्थळ तयार करणे, ऑनलाईन अर्ज मागविणे, ऑनलाईन अर्जाची पोहोच व बँक चलन प्रत निर्गमित करणे, परिक्षा प्रवेशपत्र तयार करणे, परिक्षार्थींना लघुसंदेश (SMS) देणे, बहुपर्यायी प्रश्न संच तयार करणे, ऑनलाईन परिक्षा एका/अनेक सत्रामध्ये घेणे, इत्यादी कामकाज क्षमतेचा तपशिल देण्यात यावा. |
| 5 | राज्यस्तरीय तालीकेमध्ये नाव समाविष्ट होण्यासाठी संस्थेमार्फत अर्ज करण्याबाबत संस्थेच्या संचालक मंडळाद्वारे निर्णय घेतला असणे आवश्यक आहे. | संस्थेच्या संचालक मंडळ ठरावाची स्वयं स्वाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी. यामध्ये नामतालीकेसाठी अर्ज करण्याच्या निर्णयाचा उल्लेख तसेच अर्जावर सही करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव, संस्थेमधील पदनाम, भ्रमणध्वनी व ई-मेल नमुद करावा. |
| 6 | सन 2021-22 चे आयकर विवरणपत्र दाखल केलेले असावे. | आयकर विवरणपत्राची स्वयं स्वाक्षांकीत प्रत सादर करावी. |
| 7 | संस्थेच्या संचालकांची नावे व पत्ते | सदर माहीती संस्थेच्या लेटरहेडवर स्वयं स्वाक्षांकीत करुन द्यावी. |
| 8 | संकीर्ण सुचना | संस्थेस आवश्यक वाटेल अशी माहीती पुरक कागदपत्रांसह सादर करता येईल. |

**संकीर्ण सुचना**

1) अर्ज करावयाचा कालावधी दिनांक 19.4.2023 ते 02.05.2023 सकाळी 11.00 ते सायं. 05.00 वाजेपर्यंत राहील, या हेतुने इच्छुक संस्थांनी इंडियन पोस्ट/कुरीयर/समक्ष अर्ज सादर करावेत. या मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचे अर्ज पुरक कागदपत्रांच्या सिलबंद लिफाफा श्री. सुनिल जगताप, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अधिन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे स्टेशन, पुणे-1 यांचे नावे पाठविण्यात यावे. (भ्रमणध्वनी क्रमांक 976774401)
2) प्राप्त अर्जांची छाननी राज्यस्तरीय तालीका तयार करावयाच्या प्रयोजनार्थ गठीत समितीमार्फत दिनांक 04.05.2023 रोजी करण्यात येईल. सदर समितीस आवश्यक वाटल्यास संबंधीत संस्थेस/अर्जामध्ये नमुद प्रतिनिधीस समक्ष खुलासा करण्यासाठी/पुरक माहीती सादर करण्यासाठी दिनांक 04.05.2023 रोजी बोलाविण्यात येईल.
3) राज्यस्तरीय अधिकृत संस्थांची तालीका प्रसिध्दीच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास, त्याचप्रमाणे तालीकेची मुदत तसेच तालीकेवर यानंतर नव्याने समाविष्ट करावयाच्या संस्था याबाबत यथावकाश अवगत करण्यात येईल.
4) राज्यस्तरीय तालीकेवर अधिकृत संस्थेचे नाव समाविष्ट करण्यासाठी विहीत केलेल्या

कार्यपध्दतीशिवाय अन्य कार्यपध्दतीद्वारे अर्ज करणे, राजकीय स्वरुपाचा हस्तक्षेप यासारख्या बाबी निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेचा अर्ज नामंजूर करण्याचे अधिकार समितीने राखुन ठेवले आहेत.

सही/-
(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे